स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मुख्य कार्यालय विरार
विरार (पु)
ता. वसई, जि. पालघर — ४०१३०५

दूरध्वनी : 0250-2525101/02/03/04/05/06
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. वविशम/वाचनालय/ ८३/२०२५
दिनांक - ३०/०४/२०२५

# जाहीर दरपत्रक सूचना

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती "आय" वसई गाव येथील कै. डॉ. धोंडो गोविंद अभ्यंकर स्मृती ग्रंथालय व वाचनालयाकरिता सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता लागणारी दैनंदिन वर्तमानपत्र, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, वार्षिके व दिवाळीअंक इ. वाचनसाहित्य खरेदी करावयाचे आहे. त्याकरिता सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत जाहिर दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रकामध्ये दरपत्रकधारकाने मराठी, हिंदी, इंग्रजी, व गुजराती व उर्दु अश्या विविध भाषेतील वर्तमानपत्र, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, वार्षिके व दिवाळीअंक इ. वाचनसाहित्याचे दर स्वतंत्रपणे सादर करावयाचे आहेत. दरपत्रकधारकाने वरील कामाचा दरपत्रकाचा सिलबंद लिफाफा बुधवार दि. ०५/०५/२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय वसई गाव प्रभाग समिती (आय) येथे कार्यालयात दिलेल्या मुदतीत जमा करावयाचा आहे.

| अ. क्र | कामाचा तपशिल | तपशिल | सर्व प्रकारच्या वाचनसाहित्याचे एकत्रित दर (सूट) टक्केवारी |
|---|---|---|---|
| | सार्वजनिक वाचनालयासाठी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता लागणारी वर्तमानपत्र, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, वार्षिके व दिवाळी अंक इ. वाचनसाहित्य पुरवठा करणे. | वर्तमानपत्र साप्ताहिके पाक्षिके मासिके नियतकालिके वार्षिके दिवाळी अंक | सूट (अंकात) —<br>सूट (अक्षरात) — |

अटी शर्ती :-

१) दरपत्रकधारकाने स्वत:चे / संस्थेचे लेटरहेडवर दरपत्रक सादर करावयाचे आहे.

२) दरपत्रकधारकाने दरपत्रक सादर करतांना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावयाचा आहे.त्यापैकी लिफाफा क्र.०१ हा तांत्रिक बाबींचा असून त्यामध्ये प्रामुख्याने स्वत:चे /संस्थेचे पॅनकार्ड, आधारकार्ड इ. सर्व कागदपत्रांची छायांकित प्रत काढुन त्या स्वयंसाक्षांकित करून त्यासोबत इसारा रक्कमेचा (एकुण मंजूर रक्कमेच्या १ %) रु. २०००/ - इतक्या रक्कमेचा धनाकर्ष, ही सर्व कागदपत्रे लिफाफा क्र. ०१ (तांत्रिक बाबींचा लिफाफा) मध्ये भरुन लिफाफा सिलबंद करावा. तसेच लिफाफा क्र. ०२ हा वित्तीय बाबींचा लिफाफा असून त्यामध्ये दरपत्रकधारकाने नमूद कामासाठी आपले सर्वकरासहीत असलेले दर नमूद करावेत. (दर नमूद करतांना कोणत्याही स्वरुपाची खाडाखोड करु नये.) व लिफाफा क्र. ०२ सिलबंद करावा.

३) दरपत्रकधारकाने सादर केलेल्या लिफाफयापैकी लिफाफा क्रमांक ०१ या तांत्रीक बाबींच्या लिफाफयामधील कागदपत्रे अपुर्ण असल्यास अशा दरपत्रकधारकाचा लिफाफा क्र. ०२ उघडण्यात येणार नाही. पडताळणी अंती सदरचे दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल.

४) मुदतीत प्राप्त झालेली कोणतीही अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार आयुक्त-वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

५) दरपत्रकधारकाने नमूद वाचनसाहित्याचा पुरवठा सार्वजनिक वाचनालयाने नेमून दिलेल्या ठिकाणी मुदतीत व वेळेत करावयाचा आहे.

६) मनुष्यबळ, वाहन व यंत्रसामुग्री महानगरपालिका पुरविणार नाही.

७) नमूद कामाचा पुरवठा करतांना दरम्यान होणा-या अपघात अथवा दुर्घटना यामुळे होणा-या जिवित व वित्तहानीस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

८) शासनाचे कर शासनास व महानगरपालिकेच्या फंडात जमा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची आहे.

९) वरील अटींचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.

१०) उक्त नमूद काम करताना सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत कामासंबंधी वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांचे पालन करणे दरपत्रकधारकास बंधनकारक आहे .

११) कामासंबंधी भविष्यकाळात लेखापरिक्षणात काही त्रुटी आढळल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ही संबंधीत दरपत्रकधारकाची राहील.

१२) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर दरपत्रकधारकाने ०५ दिवसाचे आत कार्यालयात प्रत्यक्ष उप स्थत राहून सदरच्या कामाचा करारनामा रुपये ५००/- स्टॅम्पपेपरवर करावयाचा असून मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

१३) करारनामा झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव कामातून माघार घेता येणार नाही.

१४) सदरचे दरपत्रक महानगरपालिकेच्या सुचना फलकावर व अधकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

उप-आयुक्त, (वाचनालय)
वसई विरार शहर महानगरपालिका